पेजिनेशनसाठी
अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १७० । किंमत - ५ रू. संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) बुधवार १५/०७/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

## डोळ्यांचे पारणे फेडणारा सामद्र चा 'रिव्हर्स फॉल...'




अकोले तालुक्यातील साम्रद येथील रिव्हर्स फॉल (उलट धबधबा) पाहण्यासाठी पर्यटकांची गर्दी होत आहे. हा धबधबा अंदाजे अडीचशे-तीनशे फूट उंचीचा आहे, फेसाळणारे पाणी खडकावर आपटून उलटे उडते आणि नंतर खालच्या दिशेने वाहते. या धबधब्याला 'रिव्हर्स वॉटरफॉल' म्हणतात. दरीला जवळ करणारे धबधबे पाहण्यापेक्षा निसर्गाची ही अद्भुत किमया पाहण्यासाठी पर्यटक मोठी गर्दी करत आहेत. उलट्या धबधब्याचा अविष्कार हा संपूर्णतः वारेच्या दाबावर अवलंबून आहे. वाऱ्याचा दाब असल्यास मनमोहक व डोळ्यांचे पारणे फेडणारा असा नजारा दृष्टीस पडतो.

# तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईचा राज्यात धसका

## संगमनेरात गुटखा विक्रीला मोठा आळा




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यात अवैध गुटखा व भेसळयुक्त अन्नपदार्थांविरोधात अन्न व औषध प्रशासन (एफडीआय) आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सुरू केलेल्या धडक कारवाईचा परिणाम आता संगमनेरातही स्पष्टपणे दिसून येत आहे. काही दिवसांपूर्वी शहरातील किराणा दुकाने, जनरल स्टोअर्स, पानटपऱ्या तसेच छोट्या व्यावसायिकांकडे सहज उपलब्ध होणारा गुटखा आता जवळपास गायब झाल्याचे चित्र आहे. कारवाईच्या भीतीने अनेक लहान दुकानदारांनी गुटखा विक्री पूर्णपणे बंद केल्याचे दिसून येत आहे.

अवैध गुटखा आणि भेसळयुक्त अन्नपदार्थांची विक्री करणाऱ्यांविरोधात कोणतीही दयामाया दाखवली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिल्याने राज्यभरातील गुटखा विक्रेत्यांमध्ये धसका निर्माण झाला आहे. त्याचा थेट परिणाम संगमनेर शहर आणि तालुक्यातील किरकोळ विक्रेत्यांवर झाला असून, खुलेआम होणारी गुटखा विक्री मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

मात्र, काही गुटखा माफिया अद्यापही यंत्रणेतील भ्रष्ट व लाचार घटकांशी संगनमत करून ठराविक ठिकाणांहून गुप्तपणे गुटख्याचा पुरवठा करत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे गुटखा मिळणे कठीण झाले असून, तो आता चढ्या दराने विकला जात असल्याचेही समोर येत आहे. पूर्वी दोन रुपयांना मिळणारा गुटखा बंदीनंतर पाच ते सात रुपयांपर्यंत पोहोचला होता. आता त्याच गुटख्यासाठी दहा ते बारा रुपये मोजावे लागत असून, तोही सहज उपलब्ध होत नसल्याने व्यसनाधीनांची मोठी गैरसोय होत आहे. परिणामी अनेकजण पुन्हा तंबाखूजन्य पर्यायांकडे वळताना दिसत आहेत.

काही दिवसांपूर्वी कऱ्हे घाटात झालेल्या वाहन अपघातानंतर गुटखा वाहतुकीचे रॅकेट उघडकीस आल्याने या अवैध व्यवसायाची व्याप्ती पुन्हा चर्चेत आली. या घटनेनंतर गुटखा तस्करी रोखण्यात स्थानिक यंत्रणेला कितपत यश आले आहे, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, पोलिस प्रशासनावरही टीकेची झोड उठत आहे. स्थानिक पातळीवर गुटखा माफिया कोण आहेत आणि त्यांचे जाळे कुठे कार्यरत आहे, याची माहिती संबंधित यंत्रणांना असल्याची चर्चा असली तरी काही भ्रष्ट घटकांकडून त्यांना संरक्षण मिळत असल्याचे आरोप नागरिकांकडून केले जात आहेत. त्यामुळे मोठ्या रॅकेटवर निर्णायक कारवाई करण्याची मागणीही जोर धरत आहे. विशेष म्हणजे, गुटखा आणि तंबाखूच्या व्यसनामुळे अल्पवयीन मुलेही मोठ्या प्रमाणात या विळख्यात अडकत होती. त्यामुळे खुलेआम होणारी गुटखा विक्री कमी झाल्याने पालक वर्गाने समाधान व्यक्त केले आहे. शाळा-महाविद्यालयांच्या परिसरातही गुटख्याची सहज उपलब्धता कमी झाल्याचे चित्र असून, ही मोहीम सातत्याने सुरू राहिल्यास व्यसनमुक्त समाजाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, अवैध गुटखा तस्करी आणि विक्री पूर्णपणे बंद करण्यासाठी अन्न व औषध प्रशासन, पोलीस आणि संबंधित यंत्रणांनी संयुक्तपणे सातत्याने कारवाई करणे आवश्यक असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. मोठ्या गुटखा रॅकेटचा कायमस्वरूपी बंदोबस्त झाल्यासच या कारवाईला खऱ्या अर्थाने यश मिळेल, अशी भावना संगमनेरकरांमधून व्यक्त होत आहे.

# दोन्ही राष्ट्रवादीतील सत्तासंघर्ष टोकाला

## पवारांच्या आमदारांचा कल एनडीएकडे, सुनेत्रा पवारांच्या पदाला आव्हान



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्राच्या राजकारणात झपाट्याने राजकीय घडामोडी घडत आहे. पक्षीय फाटाफूट आणि सत्तेच्या राजकारणाला मोठे महत्व प्राप्त झाले आहे. यातूनच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या आमदारांचा मोठा कल सत्तेत जाण्याचा आहे. तर दुसरीकडे सुनेत्रा पवार यांच्या राष्ट्रवादीतही अंतर्गत कलह समोर आला आहे. त्यांच्या अध्यक्षपदालाच थेट पक्षातून आव्हान दिले जाणार आहे. या दोन्ही राष्ट्रवादीच्या घडामोडीकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

अजित पवारांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आली. मात्र पक्षाचे माजी राष्ट्रीय सचिव आणि ज्येष्ठ नेते सच्चिदानंद सिंह यांनी वकिलांमार्फत नोटीस पाठवून सुनेत्रा पवारांच्या निवडीवर आक्षेप नोंदवला असून राष्ट्रीय अध्यक्षपदाची निवडणूक पुन्हा घेण्याची मागणी केली आहे. या घडामोडींमुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रफुल्ल पटेल-सुनील तटकरे विरुद्ध सुनेत्रा पवार-पार्थ पवार असा अंतर्गत कलह पुन्हा एकदा चव्हाट्यावर आल्याची चर्चा रंगली आहे. सच्चिदानंद सिंह यांनी सुनेत्रा पवार यांच्या निवडीबाबत काही तांत्रिक आणि घटनात्मक मुद्दे उपस्थित केले आहेत.

अजित पवार यांच्या निधनानंतर, १७ फेब्रुवारी २०२६ रोजी निवडणूक आयोगाला देण्यात आलेल्या सुधारित घटनेनुसार, नवीन अध्यक्ष निवडेपर्यंत राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांना सर्वाधिकार असताना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस ब्रिजमोहन श्रीवास्तव यांनी कोणत्या अधिकारात २६ फेब्रुवारीला राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक बोलावली? ही बैठक बोलावण्यासाठी १८ फेब्रुवारीला जे पत्र निवडणूक आयोगाला दिले त्यावर तत्कालीन राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्यांची संमती घेण्यात आली नव्हती. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून झालेली निवड बेकायदेशीर असल्याचा दावा सिंह यांनी केला आहे.

या वाढत्या वादावर प्रफुल्ल पटेल यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणाले की, सुनेत्रा पवार यांना पाठवलेल्या नोटीसशी माझा कुठलाही संबंध नाही. त्या नोटीसला फार महत्त्व देण्याचे कारण नाही. सुनेत्रा पवार यांची निवड पक्षाच्या घटनेला धरूनच झाली आहे. मात्र पक्षातील सद्यःस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले, अजित पवार यांच्या निधनानंतर पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली. ती भरून काढणे गरजेचे आहे. त्यासाठी पक्षात काही सुधारणा आवश्यक आहेत, हे माझे वैयक्तिक मत आहे.

तर दुसरीकडे महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा मोठा भूकंप होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील ऐतिहासिक फुटीनंतर आता शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदारही वेगळी भूमिका घेण्याच्या तयारीत आहे. पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या टप्प्यात विधिमंडळ अधिवेशनादरम्यान शरद पवार गटाच्या आमदारांची एक महत्त्वाची बैठक जयंत पाटील यांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीची आतली माहिती आता समोर येत आहे. पक्षाचे एकूण १० आमदारांपैकी ९ आमदार या बैठकीला उपस्थित होते. जयंत पाटील यांनी या सर्व आमदारांची मते आणि मतदारसंघातील अडचणी जाणून घेतल्या.

बैठकीत बहुतांश आमदारांनी भाजप आणि एनडीएसोबत जाण्याचा कल दर्शवला आहे. मात्र यामध्ये एक मोठी अट ठेवण्यात आली आहे. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सामील न होता, थेट भाजपप्रणीत एनडीएचा घटक पक्ष म्हणून काम करावे, अशी गळ आमदारांनी जयंत पाटलांना घातली आहे. मतदारसंघातील रखडलेल्या विकासकामांसाठी मिळणारा शासकीय निधी आणि आगामी २०२९ च्या विधानसभा (पान४)

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
जुने दिपाली फर्निचर, बस स्टँड समोर, नारायणगाव
संगमनेर (02425) 222226 | अ.नगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132

मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर, चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# आधी रस्त्याचे काम पूर्ण करा, मगच टोल घ्या

## नाशिक-पुणे महामागार्गाच्या अपुऱ्या व निकृष्ट कामाविरोधात राष्ट्रवादीचा इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाचे अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे काम पूर्ण होईपर्यंत हिवरगाव पावसा टोलनाक्यावर टोल वसुली तात्काळ बंद करावी, तसेच कंत्राटदार शंकर रामचंद्र इन्फ्रा प्रा. लि. कंपनीवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून तिला कायमस्वरूपी ब्लॅकलिस्ट करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसने केली आहे. अन्यथा २० जुलै २०२६ पासून जिल्हाध्यक्ष कपिल पवार यांच्या नेतृत्वाखाली टोलनाका कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा शहराध्यक्ष प्रविण कानवडे यांनी दिला. यासंदर्भातील निवेदन प्रांताधिकारी अरुण उंडे यांना देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, बोटा ते कऱ्हे घाट या मार्गावरील काम अत्यंत संथ व निकृष्ट दर्जाचे असून आवश्यक सूचना फलक, रिफ्लेक्टर्स, ब्लिंकर्स, स्ट्रीट लाईट आणि सुरक्षित पर्यायी रस्त्यांचा अभाव आहे. बोगद्यांमध्ये पावसाचे पाणी साचत असून वाहतूक धोकादायक बनली आहे. पुलांची कामे रखडल्याने वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

गेल्या काही महिन्यांत या महामार्गावर झालेल्या अपघातांत ५० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून शेकडो जण जखमी किंवा अपंग झाले आहेत. या दुर्घटनांसाठी कंत्राटदार कंपनीचा निष्काळजीपणा जबाबदार असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे. मृतांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत, अपंगांच्या उपचाराचा खर्च कंपनीकडून वसूल करणे, तसेच संपूर्ण कामाचे स्वतंत्र तृतीय पक्षामार्फत गुणवत्ता व सुरक्षा ऑडिट करण्याची मागणीही करण्यात आली आहे.

प्रशासनाने सात दिवसांत ठोस कारवाई न केल्यास २० जुलैपासून हिवरगाव पावसा टोलनाका कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर शहराध्यक्ष प्रविण कानवडे, महिला जिल्हाध्यक्ष वैशाली राऊत, प्रसाद गोरे, रईस पठाण, भाऊ म्हस्के, अमोल म्हस्के, मारुती सोनवणे आदींच्या सह्या आहेत.

# वृक्षारोपण करून संवर्धन करणे काळाची गरज - आ. अमोल खताळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रत्येकाला उत्तम ऑक्सिजन मिळावा यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करुण त्याचे संवर्धन कारणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ संगमनेर आगार आणि प्रवासी सेवा संस्थेच्या वतीने संगमनेर बसस्थानक आवारात वृक्षारोपण करताना ते बोलत होते एस. टी. महामंडळातर्फे हरित भविष्यासाठी संपूर्ण राज्यात वृक्षारोपण उपक्रम राबविण्यात आला आहे.

आ. खताळ म्हणाले, पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास मानवी जीवनास घातक आहे म्हणून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले.

यावेळी संगमनेर आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड, वसंत गंभीर, प्रवासी सेवा संस्थेचे अध्यक्ष अनिल भोसले, संजय क्षत्रिय, कारभारी देव्हारे, मुरतजा बोहरी, लहानु सदगीर, शांताराम आडेप, अमित पाटणकर, नितीन मोहाले, सुरेश डग, सचिन गवारे, विनोद गायकवाड, सिमोन रुपटक्के ,बाळासाहेब हेंद्रे आदी उपस्थित होते.

# अवैध वाळू साठा डंपरसह जप्त



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - घारगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत बेकायदेशीर वाळू वाहतुकीवर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. येठेवाडी गावाच्या शिवारातून अवैध वाळू घेऊन जाणाऱ्या एका लाल रंगाच्या टाटा डंपरवर पोलिसांनी छापा टाकून चालकाला ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी एकूण १० लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ जुलै २०२६ रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास घारगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे यांना एका गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली. येठेवाडी गावाच्या शिवारातून एक लाल रंगाचा टाटा कंपनीचा डंपर (क्रमांक चक २० डीटी ०२३९) बेकायदेशीररीत्या वाळू भरून १९ मैल मार्गे घारगावच्या दिशेने जाणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षकांनी तातडीने पोलीस हेडकॉन्स्टेबल विलास कोकाटे, पोलीस कॉन्स्टेबल प्रमोद गाडेकर आणि पोलीस कॉन्स्टेबल सुभाष शिवाजी बोडखे यांना कारवाईचे आदेश दिले. पोलीस पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन खाजगी वाहनाने जाऊन सापळा रचला. रात्री पावणे अकरा वाजण्याच्या सुमारास माहिती मिळालेला लाल रंगाचा डंपर येताना दिसला. पोलिसांनी प्राईड हॉटेलजवळ या डंपरला थांबण्याचा इशारा केला. डंपर बाजूला घेऊन चालकाकडे वाळू वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारणा केली असता, त्याच्याकडे कोणताही वैध परवाना नसल्याचे समोर आले.

पोलिसांनी दोन पंचांसमक्ष डंपर चालकाला नाव आणि पत्ता विचारला असता, त्याने आपले नाव चंद्रकांत यमनाजी रोडे (वय ४२ वर्षे, रा. येठेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर) असल्याचे सांगितले. डंपरची तपासणी केली असता त्यात अंदाजे २०,००० रुपये किमतीची २ ब्रास बेकायदेशीर वाळू मिळून आली. तसेच १० लाख रुपये किमतीचा लाल रंगाचा टाटा ९१२ डंपर असा एकूण १० लाख २० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी पंचांसमक्ष जप्त केला.

याप्रकरणी चालकाकडे अधिक चौकशी केली असता, ही वाळू गोरख उर्फ सचिन रावसाहेब रोडे (रा. येठेवाडी, ता. संगमनेर) याने मुळा नदीपात्रातून भरून आणण्यास सांगितल्याचे चालकाने कबूल केले.

# दंडकारण्य अभियानांतर्गत जास्तीत जास्त वृक्ष लागवड करा - मा. आ. डॉ. सुधीर तांबे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - ग्लोबल वार्मिंगची समस्या, कमी पाऊस,वाढलेली उष्णता. दुष्काळ या सर्व समस्यावर मात करण्यासाठी पर्यावरण संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. यावर्षी दंडकारण्य अभियानांतर्गत जास्तीत जास्त वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करा वृक्षारोपण व संवर्धन हीच खरी मानवतेची व ईश्वराची सेवा ठरणार असल्याचे दंडकारण्य अभियानाचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांनी म्हटले आहे.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर दंडकारण्य अभियानाच्या नियोजन बैठकीत ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, प्रकल्प प्रमुख सौ. दुर्गाताई तांबे, सभापती शंकरराव खेमनर, सरपंच सोमनाथ गोडसे, गोरख नवले, गोरख सोनवणे, सुभाष सानप, योगेश पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, आदिवासी सेवक प्रा.बाबा खरात, समन्वयक प्राचार्य दशरथ वर्पे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.


यावेळी बोलताना मा. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली राबवले जात असलेले दंडकारण्य अभियान ही पर्यावरण संवर्धनाची मोठी लोकचळवळ ठरली आहे. वृक्षारोपण व संवर्धन ही मानवतेची गरज आहे आणि खऱ्या अर्थाने यामधून परमेश्वराची सेवा होणार आहे म्हणून या पावसाळ्यामध्ये प्रत्येकाने जास्तीत जास्त वृक्षारोपण करून त्याचे संगोपन करा. या अभियाना मधून सप्तशृंगी गडावर १०० हेक्टर वर वृक्षारोपण करण्यात आले असून अनेक वृक्ष जगले आहेत याचबरोबर तालुक्यातील विविध डोंगरांवरचे वृक्ष विविध सहकारी संस्थांनी जगवली आहेत. यामध्ये प्रत्येकाचा सहभाग महत्त्वाचा आहे.

तर सौ. दुर्गाताई तांबे म्हणाल्या की, तालुक्यातील सहकारी संस्थांच्या मदतीने वृक्षारोपण व संवर्धनाचे मोठे काम झाले आहे. मात्र अनेक ठिकाणी वनवे लावले जात आहे हे अत्यंत चिंताजनक आहे यावर्षीचा उन्हाळा भयानक होता जास्त उन्हामुळे झाडे करपले गेली तरीही अनेक झाडांना पाणी देऊन ते जगविण्यात आली. उन्हाळ्यामध्ये झाडे जगवणे अवघड असून शेतकऱ्यांनी आपल्या जवळील मोकळ्या जागेत वृक्षारोपण करावे असे आवाहन त्यांनी केले.

**वनश्री पुरस्काराबद्दल मालदाड गावचा गौरव**

**मालदाड गावचे सर्व ग्रामस्थ व सरपंच यांनी अत्यंत प्रामाणिकपणे व तळमळीने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व संवर्धन केले. हा पॅटर्न आदर्शवत ठरला आहे. वृक्षारोपणामुळे अनेकांना रोजगाराच्या संधी मिळाली या अंतर्गत ६० लाख रुपयांचा रोजगार गावामध्ये निर्माण झाला. याचबरोबर १४ एकरवर वृक्षरोपण केल्यातून शेवगा, आंबा यामधून गावाला मोठे उत्पन्नही मिळाले या कामाची दखल घेऊन त्यांना वनश्री पुरस्कार मिळाला याबद्दल सरपंच गोरख नवले यांचा मा.आ.डॉ.सुधीर तांबे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.**

# आषाढाच्या आगमनासह जागते कालिदासांच्या काव्यस्मृती



आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी 'महाकवी कालिदास दिन' साजरा केला जातो. महाकवी कालिदास यांच्या जन्मतिथीबाबत निश्चित ऐतिहासिक नोंद उपलब्ध नसल्याने त्यांच्या अमर काव्यकृती मेघदूत मधील आषाढस्य प्रथम दिवसे या प्रसिद्ध उल्लेखाच्या स्मरणार्थ हा दिवस त्यांच्या नावाने साजरा करण्याची परंपरा रूढ झाली आहे.

संस्कृत साहित्यातील मेरूमणी, भारतीय संस्कृतीचे वैभव आणि जगातील श्रेष्ठ कवी-नाटककार म्हणून महाकवी कालिदास यांचे स्थान अढळ आहे. त्यांच्या साहित्यामुळे भारतीय संस्कृती, निसर्ग, मानवी भावना आणि अभिजात कलेचे सौंदर्य जगभर पोहोचले. म्हणूनच त्यांचे नाव भारतीय संस्कृतीच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.

परंपरेनुसार कालिदास हे सम्राट विक्रमादित्याच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक होते. त्यांच्या जीवनाविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. सुरुवातीला ते अज्ञानी होते. विदुषी राजकन्या विद्योत्तमेशी विवाह झाल्यानंतर झालेल्या अपमानामुळे त्यांनी देवी कालीची कठोर आराधना केली. देवीच्या कृपेने त्यांना विलक्षण ज्ञान आणि अद्वितीय काव्यप्रतिभा प्राप्त झाली, अशी लोकमान्यता आहे. कालिदासांच्या साहित्याची सर्वात मोठी ओळख म्हणजे त्यातील अप्रतिम उपमा. त्यामुळेच संस्कृत साहित्यात उपमा कालिदासस्य ही म्हण प्रसिद्ध झाली आहे. त्यांच्या काव्यातील शृंगार, करुण, वात्सल्य आणि निसर्गचित्रण अतिशय तरल, अर्थपूर्ण आणि हृदयस्पर्शी आहे. मानवी भावना, पक्षी-प्राणी, ऋतू, पर्वत, नद्या आणि संपूर्ण सृष्टीचे त्यांनी जिवंत चित्रण केले आहे.

त्यांच्या साहित्यामध्ये वेद, उपनिषदे, भगवद्गीता, रामायण, महाभारत, विविध शास्त्रे, संगीत, नृत्य, ललित कला आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे सुंदर प्रतिबिंब दिसते. विद्वत्ता आणि रसिकता यांचा विलक्षण संगम त्यांच्या प्रत्येक कृतीत अनुभवायला मिळतो. आषाढ महिना म्हणजे पावसाचे आगमन. हिरवागार निसर्ग, मेघांनी भरलेले आकाश, रिमझिम सरी आणि प्रसन्न वातावरण यांचे अत्यंत सुरेख वर्णन कालिदासांनी 'मेघदूत' या महाकाव्यात केले आहे. या काव्यात कुबेराच्या शापामुळे पत्नीपासून दूर राहणारा एक यक्ष आपल्या विरहवेदनांनी व्याकूळ होऊन मेघालाच दूत मानतो आणि त्याच्यामार्फत आपल्या प्रिय पत्नीला संदेश पाठवतो. विरह, प्रेम आणि निसर्ग यांचा अद्भुत संगम या काव्यात अनुभवायला मिळतो.

कालिदासांच्या महानतेचे वर्णन करणारा एक प्रसिद्ध श्लोक असा आहे-

पुरा कवीनां गणना प्रसंगे
कनिष्ठिकाधिष्ठितः कालिदासः।
अद्यापि तत्तुल्यकवेरभावात्
अनामिका सार्थवती बभूव।।

याचा अर्थ असा की, एकदा श्रेष्ठ कवींची गणना करताना सर्वप्रथम कालिदासांचे नाव घेण्यात आले. मात्र त्यांच्याइतका दुसरा कवी अद्याप सापडला नसल्याने पुढील बोट म्हणजे अनामिका रिकामीच राहिली; त्यामुळे तिचे 'अनामिका' हे नाव सार्थ ठरले.

महाकवी कालिदास यांच्या प्रमुख साहित्यकृतींमध्ये रघुवंश, कुमारसंभव, मेघदूत, ऋतुसंहार, अभिज्ञानशाकुंतलम्, मालविकाग्निमित्रम् आणि विक्रमोर्वशीयम् या अमर कृतींचा समावेश होतो. ऋतुसंहार मध्ये भारतातील सहा ऋतूंचे रमणीय वर्णन आहे, तर अभिज्ञानशाकुंतलम् हे भारतीय नाट्यसाहित्यातील सर्वोच्च कलाकृतींपैकी एक मानले जाते.

कालिदासांचे निसर्गप्रेम अभिज्ञानशाकुंतलम् मधील एका प्रसंगातून प्रभावीपणे व्यक्त होते. सासरी जाताना शकुंतला आश्रमातील प्रत्येक वृक्षाला भेटून अश्रू ढाळते. तिच्या मैत्रिणी विचारतात, तू वडिलांचा विरह सहन होत नसल्यामुळे रडते आहेस का? त्यावर शकुंतला उत्तर देते-न केवलं तातवियोगः. ती म्हणते, मी केवळ बाबांना सोडून जात आहे म्हणून रडत नाही; या वृक्षांना मी माझे भाऊ मानते. त्यांना सोडून जाताना मन व्याकूळ होत आहे. आता यांची काळजी कोण घेणार? निसर्गाशी असलेले हे आत्मीय नातेच कालिदासांच्या साहित्याचे वैशिष्ट्य आहे.

आजही कालिदासांचे साहित्य जगभर अभ्यासले जाते. त्यांच्या काव्यातून भारतीय संस्कृतीचे वैभव, निसर्गाचे सौंदर्य, मानवी भावविश्व आणि जीवनमूल्यांचे दर्शन घडते. म्हणूनच ते सर्वकालीन महान संस्कृत कवी, साहित्यिक आणि नाटककार म्हणून आदराने स्मरणात आहेत. आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी या महान साहित्यसम्राटाला विनम्र अभिवादन करूया आणि त्यांच्या साहित्यसंपदेचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प करूया.

महाकवी कालिदासांना भावपूर्ण अभिवादन!

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

# मालपाणी विद्यालयाची पावसाळी पायी सहली व क्षेत्रभेटी उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मालपाणी विद्यालयाच्या माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या पावसाळी पायी सहली व शैक्षणिक क्षेत्रभेटी संपन्न झाल्या. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळावे, स्थानिक ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक स्थळांची माहिती व्हावी तसेच निसर्गाचा आनंद लुटता यावा या उद्देशाने विविध इयत्तांसाठी स्वतंत्र सहलींचे नियोजन करण्यात आले होते.

इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी गंगामाई घाट परिसराला भेट देऊन परिसराची स्वच्छता, नदीकाठचे नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणाचे महत्त्व जाणून घेतले. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी गुरुद्वारा मंदिर व बसस्थानकाला भेट देऊन धार्मिक सलोखा, शिस्तबद्ध व्यवस्था आणि सार्वजनिक सेवांविषयी माहिती घेतली. इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानमाता विद्यालय, चर्च तसेच शेती प्रकल्पाला भेट देऊन आधुनिक शेतीपद्धती, विविध पिके आणि शेतीतील तंत्रज्ञानाची माहिती प्रत्यक्ष पाहिली. इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी एस. आर. थोरात दूध डेअरीला भेट देऊन दूध संकलनापासून ते त्यावरील विविध प्रक्रिया, गुणवत्ता तपासणी, शीतकरण व पॅकिंगची संपूर्ण कार्यपद्धती प्रत्यक्ष अनुभवली. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी खांडेश्वर व कपारेश्वर मंदिरांना भेट देऊन दर्शन घेतले तसेच या मंदिरांचा इतिहास आणि धार्मिक महत्त्व जाणून घेतले.

इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी काशी विश्वेश्वर मंदिर, संग्राम मूकबधिर विद्यालय आणि वेल्हाळे (गुंजाळवाडी) येथील रायफल शूटिंग प्रशिक्षण केंद्राला भेट दिली. मूकबधिर विद्यालयात विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांना सांकेतिक भाषा, कृती आणि आधुनिक अध्यापन पद्धतींच्या माध्यमातून शिक्षण कसे दिले जाते याची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली. रायफल शूटिंग प्रशिक्षण केंद्रात विद्यार्थ्यांना रायफल सुरक्षितपणे कशी हाताळावी, नेमबाजीचे मूलभूत नियम, शिस्त, सुरक्षितता आणि प्रशिक्षणाची प्राथमिक माहिती प्रशिक्षकांनी दिली.

विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उत्कृष्ट नियोजन, समन्वय आणि सहकार्यामुळे यावर्षीच्या पावसाळी पायी सहली व क्षेत्रभेटी यशस्वीरीत्या पार पडल्या. मुख्याध्यापक उत्तम एरंडे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पर्यवेक्षिका रंजना पवार यांच्या सहकार्याने सहल समिती प्रमुख अमोल सस्कर व सर्व शिक्षक - शिक्षकेतर सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूग्धजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

We treat He cure's
धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
डॉ. प्रविणकुमार पानसरे
मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे
मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा, स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची
जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०




# मतदार यादी पुनरीक्षणात उत्कृष्ट काम करणाऱ्या बीएलओंचा गौरव



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेची उद्दिष्टे प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी सर्व बीएलओंनी याच समर्पित भावनेने कार्य सुरू ठेवावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी यावेळी केले.

जिल्ह्यात सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेत बीएलओंच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मतदार गणनापत्रकांचे वितरण करण्यात आले. जिल्ह्यात आतापर्यंत ९५ टक्क्यांहून अधिक गणनापत्रके मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आली असून, त्यापैकी ३० टक्क्यांहून अधिक भरलेली गणनापत्रके संकलित करण्यात आली आहेत. संकलित गणनापत्रकांतील माहितीचे संगणकीकरणही पूर्ण करण्यात आले आहे. या मोहिमेदरम्यान विविध तालुक्यांतील निवडक बीएलओंनी विशेष परिश्रम घेऊन गणनापत्रकांचे शंभर टक्के वितरण, अर्जांचे संकलन तसेच संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण केली. गौरव करण्यात आलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यामध्ये कर्जत-जामखेड मतदारसंघातील श्रीमती संगीता अशोक खेडकर (प्राथमिक शिक्षिका, गोंदर्डी), प्रकाश भाऊसाहेब नेटके (प्राथमिक शिक्षक, जळगाव), अमोल दिनकर उडाणे (प्राथमिक शिक्षक, शिंपोरा), नेवासा मतदारसंघातील श्रीमती सविता नारायण दरंदले (अंगणवाडी सेविका, कण्हेर वस्ती), शेवगाव मतदारसंघातील महेश चंद्रकांत होरणे (प्राथमिक शिक्षक, ढाकणवाडी, ता. पाथर्डी) तसेच अहिल्यानगर मतदारसंघातील रमेश दिगंबर करपे (ग्रामपंचायत कर्मचारी, कौडगाव, ता. अहिल्यानगर) यांचा समावेश होता. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी गौरवप्राप्त बीएलओंचे अभिनंदन करताना जिल्ह्यात विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेचे शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणाऱ्या सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचे कौतुक केले. प्रत्येक पात्र मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट व्हावे, यासाठी बीएलओंची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून ही जबाबदारी संवेदनशीलतेने पार पाडावी, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे, श्रीगोंदा मतदारसंघाच्या मतदार नोंदणी अधिकारी गौरी सावंत, निवडणूक शाखेच्या तहसीलदार श्वेता संचेती, नायब तहसीलदार विशाल सदनापूरकर, पुनर्वसन तहसीलदार हिमालय घोरपडे, कर्जतचे निवडणूक नायब तहसीलदार योगेश जाधव तसेच निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# आंबेडकरी चळवळीतर्फे लष्कर सुभेदार प्रफुल्ल मोकळ यांचा सत्कार

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील खांडगाव येथील लष्कर सुभेदार प्रफुल्ल बाळासाहेब मोकळ यांची भारतीय सीमा सुरक्षा दलात (बीएसएफ) निवड झाल्याबद्दल संगमनेर तालुका आंबेडकरी चळवळीच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळयामागील व्यापारी असोसिएशन हॉल येथे झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई गट)चे जिल्हाध्यक्ष तथा ज्येष्ठ आंबेडकरी नेते सुधाकर रोहम होते. प्रमुख पाहुणे म्हणून माणिक यादव, माजी सभापती बाळासाहेब गायकवाड, सुरेश देठे आणि साहित्यिक के. जी. भालेराव उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन विनोद गायकवाड, सचिन साळवे व रवी दिवे, बंटी यादव यांनी केले.

यावेळी किशोर वाघमारे, डॉ. रवींद्र घोसाळे, डी. के. जमधडे, ड. महेश उघडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी प्रफुल्ल मोकळ यांना शुभेच्छा दिल्या. भारतीय संविधानाची प्रत, संविधान उद्देशिका, शाल, हार व पुष्पगुच्छ देऊन प्रफुल्ल मोकळ यांचा सत्कार करण्यात आला.



अध्यक्षीय भाषणात सुधाकर रोहम म्हणाले, प्रफुल्ल मोकळ यांची बीएसएफमध्ये झालेली निवड ही केवळ त्यांच्या कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण आंबेडकरी चळवळीची अभिमानास्पद कामगिरी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या विचारांचा त्यांनी देशसेवेच्या माध्यमातून गौरव केला आहे. माणिक यादव यांनीही प्रफुल्ल मोकळ यांच्या यशाचे कौतुक करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर आयोजक बंटी यादव यांनी शिक्षण, शिस्त आणि जिद्दीच्या बळावर कोणतीही उंची गाठता येते, असे सांगत प्रफुल्ल मोकळ यांचा आदर्श युवकांनी घ्यावा असे आवाहन केले.

# पाणंद रस्ते कामांसाठी नामनिर्देशन प्रक्रिया सुरू

अहिल्यानगर - मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६-२७ अंतर्गत नेवासा विधानसभा क्षेत्रातील विविध कामांसाठी पात्र कंत्राटदारांच्या नामनिर्देशनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. इच्छुक व पात्र कंत्राटदारांनी विहित नमुन्यात स्वतंत्र अर्ज दि. १७ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत बंद पाकिटात उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात समक्ष सादर करावेत, असे आवाहन उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले .

मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना उपविभाग, अहिल्यानगर यांनी प्रसिद्ध केलेल्या सार्वजनिक सूचनेनुसार, जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेल्या प्रचलित तासिका दर (एल-१) दराच्या आधारावर कंत्राटदारांचे नामनिर्देशन करण्यात येणार आहे. योजनेसंदर्भातील जाहिरात, अटी-शर्ती, आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच अर्जाचा नमुना अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर तसेच उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

# रामभाऊ लक्ष्मण पवार यांचे निधन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तालुक्यातील साकूर गावचे माजी सरपंच रामभाऊ लक्ष्मण पवार यांचे मंगळवार, दि. १४ जुलै रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. ते १०२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने साकूर गावासह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

रामभाऊ पवार यांनी १९८० ते १९८५ तसेच १९८५ ते १९८७ या कालावधीत सलग दोन वेळा साकूर ग्रामपंचायतीचे सरपंचपद भूषविले. त्यांच्या कार्यकाळात गावाच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. विकासाभिमुख दृष्टीकोन, लोकाभिमुख कारभार आणि सामाजिक बांधिलकी यामुळे त्यांनी ग्रामस्थांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले.

सामाजिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले. शांत, संयमी आणि सर्वांना सोबत घेऊन काम करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनामुळे साकूर गावाने एक ज्येष्ठ, अनुभवी आणि लोकाभिमुख नेतृत्व गमावले



आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# संतांचे संगती... आत्मज्ञानाची प्रगती

## जगद्गुरू संत तुकाराम शिष्या: संत बहिणाबाई

ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।
नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार।
जनार्दन एकनाथ। खांब दिधला भागवत।
तुका झालासे कळस। भजन करा सावकाश।।



वारकरी संप्रदायाचा संपूर्ण इतिहास चार ओळीत सांगणाऱ्या या अभंगाच्या रचयित्री आहेत संत बहिणाबाई. त्या केवळ भक्त नव्हत्या. त्या कवयित्री, योगिनी आणि आत्मज्ञानी संत होत्या.

**जन्म आणि बालपण**

संत बहिणाबाईंचा जन्म सुमारे सन १६२८ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील देवगाव रंगारी येथे झाला. वडील आऊजी कुलकर्णी आणि आई जानकीबाई. घर गरीब पण विद्वान ब्राह्मणाचे होते. लहानपणापासूनच बहिणाबाईंना संसारापेक्षा भक्तीची ओढ होती. गावातील कीर्तन त्या तासंतास बसून ऐकत. वयाच्या चौथ्या पाचव्या वर्षापासूनच त्यांच्या मुखी विठ्ठलाचे नाव होते.

**विवाह आणि संघर्षमय प्रवास**

त्याकाळच्या पद्धतीनुसार वयाच्या पाचव्या वर्षीच त्यांचा विवाह विटा येथील रत्नाकर पाठक यांच्याशी झाला. रत्नाकर पाठक कर्मठ आणि शास्त्री होते. कर्जामुळे बहिणाबाईंच्या वडिलांना गाव सोडावे लागले. त्यामुळे बहिणाबाई, पती आणि आई-वडील उदरनिर्वाहासाठी गावोगाव फिरू लागले. नाशिक, त्र्यंबकेश्वर, कोल्हापूर करत ते अखेर देहूकडे आले.

**कोल्हापूरचा चमत्कार आणि गुरुप्राप्ती**

कोल्हापुरात जयरामस्वामी वडगावकरांचे कीर्तन होत असे. रत्नाकर पाठकांकडे एक काळी गाय आणि वासरू होते. आश्चर्य म्हणजे ती गाय रोज बहिणाबाईंसमवेत कीर्तनाला येऊन उभी राहायची. हरीनाम ऐकून तिच्या डोळ्यातून अश्रू येत. एकदा रत्नाकर पाठकांनी रागात गाय आणि वासराला बांधून मारले. अन्न पाण्याविना दोघेही तडफडून मरण पावले. हे पाहून बहिणाबाईंचे मन खचले. त्या अन्नपाणी सोडून बसल्या आणि शोकाने बेशुद्ध झाल्या.

त्याच अवस्थेत त्यांना स्वप्नात संत तुकाराम महाराज दिसले. तुकोबांनी त्यांच्या मस्तकावर हात ठेवून राम कृष्ण हरी हा मंत्र दिला. जागे झाल्यावर बहिणाबाईंच्या मुखातून आपोआप प्रासादिक अभंग स्फुरू लागले. येथूनच त्यांच्या संतजीवनाची खरी सुरुवात झाली.

**पतीचा विरोध आणि भक्तीचा विजय**

ब्राह्मण कुळातील स्त्रीने शूद्र मानल्या गेलेल्या तुकारामांना गुरू मानणे रत्नाकर पाठकांना मान्य नव्हते. त्यांनी बहिणाबाईंना दोरीने बांधले, मारले आणि उपाशी ठेवले. तरीही बहिणाबाई डगमगल्या नाहीत. त्या म्हणाल्या, पती तोचि गुरु, पती तोचि देव. तरी या प्रपंची परमार्थ साधावा.

बहिणाबाईंच्या निष्ठाभक्तीमुळे विठ्ठल कोपला आणि रत्नाकर पाठकांच्या अंगात दाह निर्माण झाला. पापाची जाणीव झाल्यावर त्यांनी क्षमा मागितली. बहिणाबाईंनी हात फिरवताच ते बरे झाले. नंतर रत्नाकर पाठक स्वतः बहिणाबाईंचे शिष्य झाले. दोघेही देहूला तुकाराम दर्शनासाठी गेले.

**देहूतील जीवन आणि साहित्यसेवा**


देहूत बहिणाबाईंनी तुकोबांची कीर्तने ऐकली आणि त्यांचे अभंग लिहून ठेवले. मंबोजी गोसावींसारख्यांनी तुकोबांना त्रास दिला तेव्हा बहिणाबाई ठामपणे त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या. तुकोबांच्या वैकुंठगमनानंतर त्यांनी लिहिलेले विरहाचे अभंग आजही भक्तांचे डोळे भरून आणतात.

बहिणाबाईंचे सर्वात मोठे योगदान म्हणजे मराठीतील पहिले आत्मचरित्र त्यांनी अभंगरूपात लिहिले. त्यात त्यांनी पूर्वजन्म, बालपण, लग्न, छळ आणि आध्यात्मिक प्रवास यांचे प्रामाणिक वर्णन केले. अवघड तत्त्वज्ञान त्यांनी निसर्ग आणि प्राण्यांच्या उदाहरणातून सोपे करून सांगितले. घर, संसार आणि भक्ती यांचा समतोल कसा साधावा याचा वस्तुपाठ त्यांनी घालून दिला. त्यांच्या लेखनात स्त्रीच्या वेदना आहेत, पण त्याहून मोठा आत्मविश्वास आणि ईश्वरावरील श्रद्धा आहे.

**अंतिम काळ आणि संदेश**

पती आणि मुलांना भक्तीमार्गावर आणल्यानंतर संत बहिणाबाईंनी जालना जिल्ह्यातील शिवणी शिरूर येथे वयाच्या ७२ व्या वर्षी सन १७०० मध्ये देह ठेवला. तेथील त्यांची समाधी आजही पवित्र तीर्थस्थान आहे. दरवर्षी तिथे मोठी जत्रा भरते.

संत बहिणाबाईंचे जीवन एकच शिकवण देते. परिस्थिती कितीही कठीण असली तरी गुरू आणि विठ्ठलावर दृढ विश्वास ठेवला तर सर्व संकटे पार करता येतात. त्यांनी सिद्ध केले की स्त्री घर सांभाळूनही आत्मज्ञानाच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचू शकते. म्हणूनच वारकरी संप्रदायाच्या भव्य इमारतीचा कळस असलेल्या तुकोबांची खरी शिष्या म्हणून बहिणाबाईंचे नाव आजही आदराने घेतले जाते.



संकलन, संतचरणरज...
**श्री. सदाशिव रामनाथ मुळे**
(पुणे युवावार्ता, प्रतिनिधी), मो . ८६६८३२७१७४

# उज्वल भविष्यासाठी गरूडझेप महत्वाची - प्रा. डॉ. लड्डा

युवावार्ता (प्रतिनिधी)



संगमनेर - मिळविलेल्या ज्ञानाच्या आधारे भविष्य घडविण्यासाठी प्रयत्न करा. पण हे करत असतांना तुमची गरूड झेप महत्वाची असल्याचे मत शिक्षण प्रसारक संस्था, संगमनेरचे नवनिर्वाचीत सचिव प्रा. डॉ. राजेंद्र लड्डा यांनी व्यक्त केले. महेश सत्संग मंडळ, संगमनेर आयोजीत सत्कार समारंभात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपिठावर माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष श्रीकांत (बाळासाहेब) कासट, संगमनेर माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष संजय आर. मालपाणी, महेश सत्संग मंडळाचे अध्यक्ष सतीश लाहोटी हे उपस्थित होते.

प्रा. डॉ. लड्डा पुढे म्हणाले कि, मुर्तीकार ज्याप्रमाणे दगडातुन सुंदर मुर्तीला घडवितो, त्याप्रमाणे तुमचा मुर्तीकार चांगला पाहिजे. म्हणजेच सकारात्मक विचारांच्या समुहासह रहा, त्यांच्या विचारांचे आचरण करून भविष्य घडवा. तुम्हाला स्वारस्य असलेल्या क्षेत्रात पूर्णपणे झोकुन काम केल्यास तुम्हाला निश्चितच चांगले यश मिळुन भविष्य उज्वल होईल असेही ते म्हणाले. यावेळी १० वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले श्लोक कासट, समृद्धी भुतडा, अनय चांडक, युग भंडारी, आदिती सोमाणी, स्वरूप सोमाणी, हृदया सोमाणी, देवश्री लाहोटी, श्लोक बाहेती, पलक मणियार, १२ वीमध्ये विशेष प्राविण्य मिळविलेले आदित्य भुतडा, दीप पडतानी, अनुष्का चांडक, पार्थ अट्टल, हर्ष बुब, अवनी कासट, नेटबॉलमध्ये नावलौकीक प्राप्त केलेली नंदिनी मुंदडा, यांचेसह भारताच्या ५० यशस्वी उद्योजकामध्ये सन्मानित झालेला इमॅजीका वल्डचे व्यवस्थापकीय संचालक जय मालपाणी, जेईई ॲडव्हान्समध्ये विशेष यश संपादन केलेली राशी बाहेती, कतार (सौदी अरेबिया) च्या एअरलाईन्समध्ये पायलट म्हणून नियुक्त झालेला स्वप्निल बाहेती, बी फार्ममध्ये रॅकींगमध्ये आलेला राजतिलक लड्डा, मास्टर इन फिजीओथेरपी प्रिती आसावा, एमबीबीएस मास्टर इन पीजी ची डॉ. साक्षी चांडक, बी.टेक यश भुतडा तसेच महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स चे संचालक श्रीनिवास भंडारी, अहिल्यानगर जिल्हा माहेश्वरी सभेचे कोषाध्यक्ष कुशावर्त कासट, संगठन मंत्री हरिकिसन चांडक, प्रशासकीय समिती सदस्य प्रकाश कलंत्री यांना देखील मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक महेश सत्संग मंडळाचे अध्यक्ष सतीश लाहोटी यांनी केले. तर सुत्रसंचालन करून पाहुण्यांचा परिचय प्रा. सचिन बाहेती यांनी करून दिला. कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी अध्यक्ष सतीश लाहोटी, सचिव आशिष राठी, ज्येष्ठ सदस्य बसंतकाका मणियार व त्यांच्या सर्व सहकार्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ॲंग्लो उर्दू हायस्कूलमध्ये चित्रकला रंगभरण स्पर्धा उत्साहात

युवावार्ता (प्रतिनिधी)




संगमनेर - अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्ट संचलित ॲंग्लो उर्दू हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे इयत्ता पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित चित्रकला रंगभरो स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे विद्यालयाचे माजी प्राचार्य हाजी मुश्ताक उस्मान कलादगी तर अध्यक्षस्थानी संस्थेचे ट्रस्टी हाजी शेख एजाज शमशुद्दीन होते. यावेळी विविध शाळांचे मुख्याध्यापक, कलाशिक्षक तसेच नगर पालिका शिक्षण मंडळाचे वरिष्ठ अधिकारी जाहेद अमान हैदर शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे, रंगसंगतीचे आणि सादरीकरणाचे कौतुक केले.

यावेळी अहिल्यानगर मुख्याध्यापक संघटनेच्या प्रतिनिधींनी अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्टच्या शैक्षणिक कार्याचे कौतुक करत ॲंग्लो उर्दू हायस्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेजला आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून गौरविले. तसेच विद्यालयाचे चेअरमन शेख गनी हाजीसेठ यांना 'आदर्श चेअरमन' पुरस्कार जाहीर करून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे चीफ ट्रस्टी अब्दुल्लाह हाजी हसन चौधरी, सचिव हाजी शौकतखान मोहम्मदखान पठाण, शालेय समितीचे सदस्य तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य शेख मुनव्वर खलीलुरहेमान, पर्यवेक्षक रहेमानी उबेदुर्रहमान कलीमुर्रहमान आणि सर्व शिक्षक-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन शेख सानिया निसार यांनी, तर आभार प्रदर्शन सचिव हाजी शौकतखान मोहम्मदखान पठाण यांनी केले.

# संपादकीय...

## घटस्फोटाच्या वाढत्या घटनांनी निर्माण केलेले प्रश्न

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे आपल्या संस्कृतीत म्हटले जाते. विवाह ही केवळ दोन व्यक्तींची नव्हे, तर दोन कुटुंबांची, दोन संस्कारांची आणि दोन जीवनप्रवाहांची सांगड असते. एकमेकांना समजून घेत, सुख-दुःखात साथ देत आणि संकटांवर मात करत आयुष्यभर एकत्र राहण्याची शपथ विवाहबंधनात घेतली जाते. पूर्वी विवाह हे आयुष्यभर टिकणारे नाते मानले जात असे. इतकेच नव्हे, तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळावा अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करत असत. मात्र बदलत्या काळासोबत विवाह आणि नातेसंबंधांविषयीचा दृष्टिकोन झपाट्याने बदलताना दिसत आहे. आजच्या काळात घटस्फोटाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. देशभरातील न्यायालयांमध्ये लाखो घटस्फोटाच्या याचिका प्रलंबित असून दररोज नव्या प्रकरणांची भर पडत आहे. दोन दशकांपूर्वी घटस्फोट हा शेवटचा पर्याय मानला जात होता. अनेक प्रयत्न, समेट आणि समजुतीनंतरही मार्ग न निघाल्यासच हा निर्णय घेतला जात असे. आज मात्र परिस्थिती वेगळी आहे. काही वर्षे तर सोडाच, अनेक जोडपी लग्नानंतर अवघ्या काही महिन्यांतच विभक्त होण्याचा निर्णय घेत आहेत. घटस्फोटासाठी दिली जाणारी काही कारणे पाहिली तर आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. पत्नीला साडी नेसता येत नाही, स्वयंपाक चांगला होत नाही, ती मोबाईल किंवा टीव्हीवर जास्त वेळ घालवते, ती आपला मान राखत नाही अशा कारणांवरून पतींकडून घटस्फोटाची मागणी केली जाते. दुसरीकडे पती आपल्याला वेळ देत नाही, तो फक्त आई-वडिलांचेच ऐकतो, फिरायला नेत नाही, आपल्या मनासारखे वागत नाही किंवा आपल्या भावनांचा विचार करत नाही, अशी कारणे पत्नींकडून दिली जातात. अर्थात प्रत्येक प्रकरणामागील परिस्थिती आणि वास्तव वेगळे असते. न्यायालय सर्व बाबींचा सखोल विचार करूनच निर्णय देते. मात्र क्षुल्लक कारणांवरून नाती तुटण्याची वाढती प्रवृत्ती ही समाजासाठी चिंतेची बाब ठरत आहे. यामागे बदलती जीवनशैली, वाढती स्पर्धा, ताणतणाव आणि वाढलेल्या अपेक्षा ही काही महत्त्वाची कारणे मानली जातात. आजच्या वेगवान जीवनशैलीत अनेकांकडे नात्यांसाठी वेळच उरलेला नाही. करिअर, आर्थिक स्थैर्य आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांना महत्त्व देताना अनेकदा नातेसंबंधांकडे दुर्लक्ष होते. परिणामी संवाद कमी होतो, गैरसमज वाढतात आणि दुरावा निर्माण होतो. खरे तर संसार म्हटले की मतभेद आणि वाद हे अटळ असतात. भांड्याला भांडे लागते ही म्हण याच वास्तवाची जाणीव करून देते. दोन वेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती एकत्र राहतात तेव्हा विचारांमध्ये मतभेद होणे स्वाभाविक आहे. मात्र मतभेदांचे रूपांतर मनभेदात होऊ न देणे हीच खरी कसोटी असते. वाद झाल्यानंतर दोघांपैकी एकाने शांत राहणे, समोरच्याचे म्हणणे ऐकून घेणे आणि योग्य वेळी संवाद साधणे यामुळे अनेक समस्या सहज सुटू शकतात. नात्यांमध्ये दुरावा निर्माण होण्यामागे अहंकार हे आणखी एक मोठे कारण आहे. मीच बरोबर किंवा मीच का माघार घ्यावी? ही भूमिका अनेकदा नात्यांमध्ये कटुता निर्माण करते. चूक मान्य करण्याची तयारी आणि तडजोड करण्याची वृत्ती नसल्यास लहान वादही मोठ्या संघर्षात रूपांतरित होतात. काही वेळा नातेवाईक किंवा बाहेरील व्यक्तींचा अनावश्यक हस्तक्षेपही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनवतो. वाद मिटविण्याऐवजी त्यामध्ये आणखी तेल ओतण्याचे काम काहीजण नकळत करत असतात. कोणतेही नाते टिकवण्यासाठी विश्वास हा सर्वात महत्त्वाचा पाया असतो. एकदा विश्वासाला तडा गेला की नात्यात संशय, गैरसमज आणि दुरावा निर्माण होतो. त्यामुळे पती-पत्नी दोघांनीही परस्परांवरील विश्वास जपणे आवश्यक आहे. त्याचबरोबर परस्पर सन्मान, समजूतदारपणा आणि एकमेकांच्या भावनांचा आदर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. नात्यातील छोट्या-छोट्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून मोठ्या चित्राकडे पाहण्याची सवयही आवश्यक आहे.

## दोन्ही राष्ट्रवादीतील...

पान १ वरून - निवडणुकीत राजकीय यश मिळवण्यासाठी सत्तेसोबत जाणे आवश्यक असल्याचे मत या आमदारांनी मांडले आहे.

या संपूर्ण घडामोडींमध्ये आमदार रोहित पवार यांनी या बैठकीपासून स्वतःला अलिप्त ठेवले होते. भाजप किंवा एनडीएसोबत जाण्यास रोहित पवार यांचा तीव्र विरोध असल्याचे समजते. बैठकीनंतर रोहित पवारांनी सर्व आमदारांशी फोनवरून संपर्क साधून त्यांची मते जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आमदारांच्या या भूमिकेनंतर आता अंतिम निर्णय घेण्यासाठी चेंडू शरद पवारांच्या कोर्टात गेला आहे. जयंत पाटील यांनी आमदारांना सांगितले की, मी या सर्व आमदारांची भावना आणि निरोप पक्षप्रमुख शरद पवारांपर्यंत पोहोचवेन. सूत्रांच्या माहितीनुसार, या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी स्वतः शरद पवार लवकरच आमदार आणि खासदारांची एक संयुक्त बैठक बोलावणार आहेत.

# ब्राह्मण उत्सव युवक समितीच्या अध्यक्षपदी शुभम उपाध्ये



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राजस्थानी ब्राह्मण समाजातील युवकांना एकत्रित करुन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि सेवाभावी उपक्रमांना अधिक बळ देणार्‍या राजस्थानी ब्राह्मण उत्सव युवक समितीच्या आगामी वर्षासाठीच्या पदाधिकार्‍यांची एकमुखाने निवड करण्यात आली असून, समितीच्या अध्यक्षपदी शुभम उपाध्ये यांची बिनविरोध निवड झाली आहे. समाजाच्या ऐतिहासिक परंपरेला आधुनिक व सामाजिक उपक्रमांची जोड देत युवकांना संघटित करण्याची जबाबदारी आता त्यांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीमुळे यंदाच्या भगवान श्री जगदीश जयंती उत्सवासह विविध समाजोपयोगी उपक्रमांना अधिक व्यापक स्वरुप प्राप्त होईल, असा विश्वास समाजबांधवांनी व्यक्त केला आहे.

संगमनेर आणि राजस्थानी ब्राह्मण समाजाचे नाते तब्बल तीन शतकांहून अधिक काळापासूनचे आहे. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी समाजाने कॅप्टन लक्ष्मी चौक परिसरात भगवान श्री जगदीश मंदिराची उभारणी केली. त्यानंतर जगन्नाथ पुरी येथे आषाढ शुद्ध द्वितीयेला निघणार्‍या ऐतिहासिक रथयात्रेच्या परंपरेतून प्रेरणा घेत संगमनेरमध्येही दरवर्षी भव्य रथयात्रेची सुरुवात करण्यात आली. तेव्हापासून आजपर्यंत समाजाच्या विश्वस्त मंडळाच्या मार्गदर्शनाखाली मंदिरापासून निघणारी ही रथयात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरुन भक्तिमय वातावरणात वाजतगाजत काढली जाते आणि पुन्हा मंदिरात येऊन तिची सांगता होते.

गेल्या दशकभरात या ऐतिहासिक परंपरेला समाजातील युवकांनी नवी ऊर्जा दिली आहे. राजस्थानी ब्राह्मण उत्सव युवक समितीच्या माध्यमातून पारंपरिक रथयात्रेला अधिक आकर्षक स्वरुप प्राप्त झाले आहे. पारंपरिक वेशभूषा, विविध वाद्यपथके, संकीर्तन करणारे मंडळ, देखणा व सुशोभित रथ, त्यामध्ये विराजमान भगवान जगन्नाथ यांचे दर्शन तसेच महिलांचे भजनी मंडळ यामुळे ही शोभायात्रा संगमनेरच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक बनली आहे. प्रत्येक वर्षी हजारो भाविक या सोहळ्यात सहभागी होत भक्तिरसाचा आनंद लुटतात.

धार्मिक परंपरा जपत असतानाच उत्सव युवक समिती समाजोपयोगी कार्यातही सक्रिय आहे. युवक समितीच्या वतीने नियमितपणे आरोग्य तपासणी शिबिरे, विविध शासकीय योजनांची माहिती देणारी जनजागृती शिबिरे, युवकांसाठी क्रीडा स्पर्धा तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणार्‍या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. त्यामुळे समितीने समाजातील युवकांना एक सक्षम आणि सकारात्मक व्यासपीठ उपलब्ध करुन दिले आहे. आगामी वर्षासाठी निवडण्यात आलेल्या कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी प्रीतम खंडेलवाल, श्रेयस पंचारिया, खजिनदारपदी ललित जोशी, सचिवपदी ऋषिकेश बद्दर, प्रसिद्धी प्रमुखपदी विष्णु ओझा व साई जोशी, तर रॅली (शोभायात्रा) प्रमुखपदी नीरज उपाध्ये, लाला दायमा आणि तेजस ओझा यांची निवड करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीवर समाजबांधवांनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून, गुरुवारी (ता.१६) साजरा होणारा भगवान श्री जगदीश जयंती उत्सव आणि ऐतिहासिक रथयात्रा अधिक भव्य, दिव्य आणि संस्मरणीय करण्याचा निर्धार पदाधिकार्‍यांनी व्यक्त केला आहे.

# अकोलेत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अतिक्रमण हटविण्याची ग्राहक पंचायतीची मागणी



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अकोले शहरातील कोल्हार-घोटी रोडसह प्रमुख मार्गांवरील फुटपाथ आणि पादचारी मार्गांवरील अतिक्रमणे तातडीने हटवून सर्वोच्च न्यायालयाच्या १९ जून २०२६ च्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी ग्राहक पंचायत महाराष्ट्रच्या अकोले तालुका शाखेने केली आहे. याबाबतचे निवेदन नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांना देण्यात आले.

निवेदनात शहरातील वाढती वाहतूक, बाजारपेठेतील गर्दी आणि शैक्षणिक संस्थांमुळे फुटपाथवर दुचाकी, चारचाकी, हातगाड्या व फेरीवाल्यांच्या अतिक्रमणामुळे पादचार्‍यांना मोठा त्रास होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे चालण्यासाठी अडचणी निर्माण होत असून त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करण्यात आला.

ग्राहक पंचायतीने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा हवाला देत पादचार्‍यांसाठी अतिक्रमणमुक्त फुटपाथ, अनधिकृत पार्किंगवर नियमित कारवाई, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, बसण्याची व्यवस्था, पुरेशी प्रकाशयोजना, दिशादर्शक फलक आणि झेब्रा क्रॉसिंगची सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती तहसीलदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता आणि अकोले पोलीस निरीक्षक यांनाही देण्यात आल्या आहेत. निवेदनावर जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलीक, कार्याध्यक्ष महेश नवले, अध्यक्ष दत्ता शेनकर, राम रुद्रे, भाऊसाहेब वाकचौरे, प्रमोद मंडलीक, प्रदीप हासे आदींच्या स्वाक्षर्‍या आहेत.

## जाहीर समन्स नोटीस

राजहंस नागरी सहकारी पतसंस्था मर्या, संगमनेर, ता. संगमनेर या संस्थेने दाखल केलेले दावातील अर्जदार व जामिनदार यांना दिनांक ०१/०१/२०२६ रोजी या कार्यालयाकडुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये नोटीस देण्यात आली होती. परंतु काही इसम सुनावणीस उपस्थित न राहील्याने त्यांना खालील प्रमाणे जाहिर समन्स देण्यात येत आहे.

| अ.क्र. | दावा क्रमांक | कर्जदार व जामिनदार यांचे नाव सर्वश्री | पत्ता | दावा रक्कम ३०/०९/२०२५ |
|---|---|---|---|---|
| १ | ३०/२०२६ | मोंडल अजिमुल मुजम्मिल | मु. संगमनेर, ता. संगमनेर | १३,८८,६४८/- |
| | | खान नासीर साहेब (जामिनदार) | मु. संगमनेर, ता. संगमनेर | |
| | | शेख शाहिद निसार (जामिनदार) | मु. संगमनेर, ता. संगमनेर | |

तरी वर नमुद प्रतिवादी यांनी सुचित करणेत येते की, आपण दिनांक २७/०७/२०२६ रोजी दु. १२.०० वाजता उपनिबंधक, सहकारी संस्था, संगमनेर, प्रशाकिय भवन तिसरा मजला, नविन नगर रोड, संगमनेर या कार्यालयात हजर राहावे. सदर दिवसी व वेळेत आपण हजर न राहील्यास अथवा लेखी म्हणणे आपण सादर न केल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण – संगमनेर
दिनांक – १३/०७/२०२६

(संतोष कोरे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था, संगमनेर

**पाहिजेत**
राजवीर फार्मा
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त गरजुंनी संपर्क साधावा
मार्केटिंग – १ जागा
दुकानकामासाठी – 02
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फासनान्स पाठीमागे, २ नं गल्ली, संगमनेर
8669184141

**फ्लॅट विकणे आहे**
2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**पाहिजेत**
घरकामासाठी होतकरू महिला कामगार पाहिजे
वेळ ३ ते ७ मालदाड रोड
डॉ. शेवाळे हॉस्पिटल, विद्यानगर, संगमनेर
9822304638

तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com
क्र. कावी/ मृत्यू नोंद/५६४/२०२६
दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
दिनांक - २४/०६/२०२६

### जाहिरनामा

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. सुभाष म्हातारबा गाढवे, रा. नांदुर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक १७/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. नांदुर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची आजोबा नामे गेणु रामजी गाढवे यांचा **मृत्यू मौजे नांदुर खंदरमाळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०५/१९७३** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, नांदुर खंदरमाळ यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी, नांदुर खंदरमाळ यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**पाहिजेत**
पेट्रोल पंप वर 2 कर्मचाऱ्यांची पदभरती करायची असून, इच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी कृपया संपर्क करावा.
चैतन्य पेट्रोलियम
संगमनेर बायपास पुणे - नाशिक हायवे, घुलेवाडी, ता. संगमनेर
– संपर्क –
8888808397

**पाहिजेत**
मॉम-एबल फर्टिलिटी अँड आयव्हीएफ सेंटर, संगमनेर
आरएमओ (महिला) – १
शैक्षणिक पात्रता : BAMS / BHMS
नर्सिंग स्टाफ (रात्रपाळी) – १
हाऊसकीपिंग मावशी – २
घर कामासाठी मावशी – १
(सकाळी ९ ते सायंकाळी ५)
– संपर्क –
9860477807

**पाहिजेत**
हिशोब करण्याकरिता दोन मुले पाहिजे
(कॉम्प्युटर येणे आवश्यक)
ए. जी. एस. टोमॅटो सप्लायर्स
टोमॅटो मार्केट यार्ड, संगमनेर
दुकान क्रमांक : १२३४५
7741816770
9763531663

**पाहिजेत**
आत्मशांती टी सेंटर (सपट चहा)साठी जागा भरणे आहे.
हेल्पर – 02
ड्रायव्हर – 01
सेल्समन – 01
संपर्क- नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
सोनोग्राफी सेंटरसाठी मुलगी पाहिजे
कॉम्प्युटर व इंग्रजी टायपिंग येणे आवश्यक
(२ जागा त्वरीत भरणे आहे)
कामाची वेळ दु. १२ ते ८
संपर्क– जाधव सोनोग्राफी सेंटर मर्चंट बँकेसमोर, नविन नगर रोड, संगमनेर
9307188862

**पाहिजेत**
जानकीराम गंगाधर काजळे ज्वेलर्ससाठी
सेल्स एक्झीक्युटिव्ह -४
मार्केटिंग एक्झीक्युटिव्ह -४
हेल्पर - २
मेन रोड, संगमनेर
7588249849

**पाहिजेत**
ड्रायव्हर - २ (एल.एम.व्ही.)
क्लर्क - २ (पदवीधर)
अकाउंटट - २ (टॅली)
कॉम्प्युटर ऑपरेटर -२ पदवीधर
डॉ. इथापे हॉस्पिटल, संगमनेर
9822791484
9518556933
9370017177

**ड्रायव्हार पाहिजे**
ऑटोमॅटिक गाडीसाठी 01 जागा
मॅन्युअरल गेअर गाडीसाठी 01 जागा
निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
– संपर्क –
9117175050







SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL
Daily Yuvavarta

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेल
वेल्डर - 2 जागा
हेल्पर - २ जागा
7030125701
7972963397

# खतांची कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई - आ. खताळ



तालुक्यासाठी आवश्यक असलेला युरिया खतसाठा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कोणतीही घाई किंवा घबराट न करता गरजेनुसारच खताची खरेदी करावी. कृषी विभाग सातत्याने लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार अतिरिक्त खतसाठा उपलब्ध करून देण्यासाठी शासन स्तरावरही पाठपुरावा सुरु आहे. कोणत्याही शेतकऱ्याला खतासाठी वंचित राहू दिले जाणार नाही. तसेच कृत्रिम टंचाई निर्माण करणे, साठेबाजी करणे किंवा जादा दराने खताची विक्री करणाऱ्यांविरुद्ध कोणतीही तडजोड न करता कठोर कारवाई करण्यात येईल.

आमदार अमोल खताळ, संगमनेर

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर युरिया खताचा पुरेसा व वेळेवर पुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभागाने आवश्यक नियोजन केले असून तालुक्यासाठी सुमारे ७०० मेट्रिक टन युरिया उपलब्ध करण्यात आला आहे. त्यापैकी ३५० मेट्रिक टन युरिया तातडीने विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आला असून जर खताची कृत्रिम टंचाई व जादा दराने विक्री करण्याचा प्रयत्न केल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल अशा इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला.

खरीप हंगामात युरिया खताची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेशा प्रमाणात खत उपलब्ध व्हावे, यासाठी आमदार अमोल खताळ यांच्या संपर्क कार्यालयात कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत तालुक्यातील युरिया खतसाठा, वितरण व्यवस्था, उपलब्धता तसेच पुढील नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बैठकीस उपविभागीय कृषी अधिकारी अक्षय गोसावी, तालुका कृषी अधिकारी रेजा बोडखे, पंचायत समिती कृषी अधिकारी उघडे यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी आ. खताळ म्हणाले की, खरीप हंगामात कोणत्याही शेतकऱ्याला युरिया खतासाठी हेलपाटे मारावे लागू नयेत यासाठी प्रशासनाने प्रभावी नियोजन करावे. तसेच खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे, साठेबाजी करणे किंवा जादा दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल. अधिकृत दरानेच खताची विक्री होऊन वितरण प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखली जावी अशा सूचनाही त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. युरिया खताचा पुरवठा नियमित राहण्यासाठी कृषी विभाग सातत्याने परिस्थितीवर लक्ष ठेवून असून आवश्यकतेनुसार पुढील साठाही उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता गरजेनुसारच खताची खरेदी करावी असेही आ. खताळ यांनी सांगितले.

# मोदी सरकारचा लवकरच विस्तार

## शिंदे दिल्लीत, फडणवीस - पवारांच्या भुमिकेकडे लक्ष

मुंबई (वृत्तसंस्था)

ऑपरेशन टायगरनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे पहिल्यांदाच दिल्लीत दाखल होत आहे. केंद्रीय मंत्रिमंडळ विस्तार १७ जुलै रोजी होणार आहे. शिंदे यांच्या शिवसेनेच्या वाट्याला एक कॅबिनेट मंत्रिपद तर एक राज्यमंत्री पद येणार असल्याचे समजते. ठाकरे सेनेतून आलेल्या सहा खासदारांमध्ये मंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत शिंदे यांची बैठक होणार आहे. तर चार्टड विमानाने खासदार दिल्लीला रवाना होणार असल्याचे समजते. केंद्रीय मंत्रिमंडळात विस्तारात शिवसेनेला एक कॅबिनेटमंत्री व राज्यमंत्रीपद मिळणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यात खासदार श्रीकांत शिंदे यांना कॅबिनेट मंत्री पद दिले जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे. तर राज्यमंत्री पदासाठी नव्याने आलेल्या ६ खासदारांमध्ये रस्सीखेच असल्याचे समोर आले आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दिल्ली दौऱ्यावर असून गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेण्याची शक्यता आहे. १७ तारखेला केंद्रातील मंत्रिमंडळ विस्तार होणार आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांची केंद्रीय कॅबिनेट मंत्रिपदी वर्णी लागणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात शिवसेनेच्या सर्व खासदारांची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासोबत बैठक होणार आहे.

ठाकरे सेनेतून ६ खासदार शिंदे सेनेत दाखल झाले आहेत. यातील एकाची राज्यमंत्रीपदी वर्णी लागण्याची शक्यता आहे. धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि परभणीचे खासदार संजय जाधव यांच्यात केंद्रीय राज्यमंत्री पदासाठी रस्सीखेच होण्याची शक्यता आहे. दिल्लीत दौऱ्यात कुणाच्या गळ्यात राज्यमंत्री पदाची माळ पडते याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. या दोन्ही जिल्ह्यात त्यांच्या समर्थकांनी जल्लोषाची तयारी केल्याची माहिती आहे. तर उर्वरीत चार खासदारांना कोणत्या समितीवर घेण्यात येते याचीही चर्चा रंगली आहे. दरम्यान या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्तारात अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला स्थान मिळणार की नाही याविषयीची माहिती अद्याप समोर आलेली नाही. मंत्रिमंडळ विस्तारात सहभागाबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झाले नसल्याचे समोर येत आहे. एनडीएत सहभागी झाल्यापासून पक्षाने राज्यमंत्री पदाऐवजी कॅबिनेटची मागणी लावून धरलेली आहे.

# शुक्रवारी अकोले नगरपंचायतची विशेष सभा

## नगराध्यक्षांविरुद्धच्या अविश्वास ठरावावर होणार निर्णय

युवावार्ता (प्रतिनिधी) - अकोले - अकोलेचे नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे याच्या विरुद्ध अविश्वास ठराव दाखल झाला असून त्यावर विचार करण्यासाठी शुक्रवारी (दि. १७) नगरपंचायतीची विशेष सभा बोलाविण्यात आली आहे. यादिवशी काय निर्णय होतो याकडे शहराचे लक्ष लागले आहे.

नगराध्यक्ष वडजे हे भाजपचे असून नगरपंचायतीमध्ये माजी आमदार वैभव पिचड यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे बारा सदस्य आहेत. मात्र नगरपंचायतीमधील भाजपमध्ये अंतर्गत संघर्ष उफाळून आला आहे. १२ पैकी ९ सदस्यांनी नगराध्यक्ष वडजे यांची भारतीय जनता पक्ष शहर आघाडीच्या गटनेते पदावरून हकालपट्टी केली आहे. तसेच गटनेतेपदी नगरसेविका तमन्ना शेख यांची निवड केली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी गटनेते पद बदलास मान्यता दिली आहे. गटनेतेपद बदल हे नगराध्यक्ष बदलाच्या दृष्टीने टाकलेले पहिले पाऊल होते. माजी नगराध्यक्षा सोनाली नाईकवाडी व अन्य बारा सदस्यांनी २० मे रोजी नगराध्यक्ष वडजे व उपनगराध्यक्ष शरद नवले यांना पदावरून काढून टाकण्याची मागणी पत्राद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. या मागणीबाबत निर्णय घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी अरुण उंडे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलाविली आहे.

नगरपंचायतीमध्ये भाजप बारा, शिवसेना दोन, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) दोन आणि काँग्रेस एक असे संख्याबळ आहे. भाजपच्या आठ आणि विरोधी पाच सदस्यांसह तेरा सदस्यांनी नगराध्यक्षांना पदावरून काढून टाकण्याची मागणी केली आहे. दरम्यान भाजपच्या नवीन गटनेत्या तमन्ना शेख यांनी भाजप सदस्यांनी ठरावाचे समर्थन करण्याचा व्हिप काढला आहे. भाजपचे बंडखोर सदस्य आणि भाजप विरोधी सदस्य हा ठराव मंजूर व्हावा यासाठी एकत्र आले आहेत. ही राजकीय आघाडी केवळ सत्तेपुरती व अध्यक्ष, उपाध्यक्ष बदलापुरतीच आहे की यातून काही नवीन राजकीय समीकरणे आकार घेणार हे लवकरच स्पष्ट होईल.

# वृध्दांना चाकूचा धाक, सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जांबुत खुर्द (म्हसोबाची वाडी) येथे तीन अज्ञात दरोडेखोरांनी एका वृद्ध दाम्पत्याच्या घरात घुसून चाकूचा धाक दाखवत सुमारे २ लाख २७ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची खळबळजनक घटना मध्यरात्री घडली. याप्रकरणी घारगाव पोलीस ठाण्यात तीन अज्ञात इसमांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान या घटनेची पठार भागात एकच खळबळ उडाली आहे.

घारगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सखुबाई लहानु पारधी (वय ८०, रा. जांबुत खुर्द, ता. संगमनेर) या पहाटे सुमारे १ वाजण्याच्या सुमारास त्या व त्यांचे पती लहानु सावळेराम पारधी हे घरात झोपलेले असताना तोंड बांधलेल्या तीन अज्ञात इसमांनी घरात प्रवेश केला.

यातील एका चोरट्याने त्यांच्या पतीचे तोंड दाबून धरले, तर अन्य दोघांनी सखुबाई यांचे तोंड दाबून त्यांना पकडून ठेवले. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने तसेच घरातील उशाखाली ठेवलेली रोख रक्कम बळजबरीने काढून घेतली.

सखुबाई यांनी आरडाओरडा केल्यानंतर शेजारी राहणारे





शिवाजी सखाराम बिडकर मदतीसाठी धावून आले. मात्र, चोरट्यांपैकी एकाने त्यांना चाकूचा धाक दाखवून धमकावले आणि तिघेही घटनास्थळावरून पसार झाले.

चोरट्यांनी सुमारे दोन तोळ्यांची सोन्याची पोत, दीड तोळ्यांच्या चार सोन्याच्या पुतळ्या व एक पान, अर्धा तोळ्याचे सोन्याचे डोरले तसेच २ हजार रुपये रोख, असा एकूण २ लाख २७ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

## दिनविशेष

२020: — बिटकॉइन घोटाळ्यास प्रोत्साहन देण्यासाठी प्रमुख राजकीय व्यक्ती, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सेलिब्रिटींची ट्विटर अकाउंट हॅक झाली.
२००६: ट्विटर — हा सोशिअल प्लॅटफॉर्म सुरु झाला.
१९९७: महेशचंद्र मेहता — यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.
१९९६: पांडुरंग शास्त्री आठवले — यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार जाहीर.
१९६२: ज्ञानप्रबोधिनी संस्था, पुणे — सुरवात.
१९५५: मैनाऊ जाहीरनामा — आण्विक अस्त्रांवर बंदी घालण्यासाठी ५८ नोबेल पारितोषिक विजेत्या शास्त्रज्ञानीं या जाहीरनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या.
१९२६: — मुंबईतील कुलाबा ते क्रॉफर्ड मार्केट उपनगरी बस सेवा सुरू झाली.
१६६२: रॉयल सोसायटी, इंग्लंड — स्थापना झाली.

## जन्म

९९२: वैशाली टक्कर — भारतीय अभिनेत्री (निधन: १५ ऑक्टोबर २०२२ )
१९४९: माधव कोंडविलकर — दलित साहित्यिक
१९३७: श्री प्रभाज जोशी — भारतीय पत्रकार (निधन: ५ नोव्हेंबर २००९ )
१९३५: भगीरथ प्रसाद त्रिपाठी — भारतीय संस्कृत व्याकरणकार, भाषाशास्त्रज्ञ व योगी — पद्मश्री (निधन: ११ मे २०२२ )
१९३३: एम. टी. वासुदेवन नायर — भारतीय लेखक आणि पटकथालेखक
१९३२: नरहर कुरुंदकर — विद्वान, टीकाकार आणि लेखक (निधन: १० फेब्रुवारी १९८२ )
१९२७: प्रा. शिवाजीराव भोसले — डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (निधन: २९ जून २०१० )
१९२५: कृष्णा रेड्डी — मुद्रक, शिल्पकार आणि शिक्षक (निधन: २२ ऑगस्ट २०१८ )
१९०४: मोगुबाई कुर्डीकर — जयपूर - अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका, गानतपस्विनी — पद्म भूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार (निधन: १० फेब्रुवारी २००१ )
१९०३: के. कामराज — तामिळ नाडूचे २रे मुख्यमंत्री व स्वातंत्र्यसेनानी — भारतरत्न
१६११: मिर्झाराजे जयसिंग — जयपूरचे राजे (निधन: २८ ऑगस्ट १६६७ )
१६०६: रेंब्राँ — डच चित्रकार (निधन: ४ ऑक्टोबर १६६९ )

## मृत्यू

२००४: बानू कोयाजी — कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणाऱ्या — पद्म भूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार (जन्म: २२ ऑगस्ट १९१८ )
१९९९: जगदीश गोडबोले — पर्यावरणवादी लेखक
१९९९: इंदुताई टिळक — सामाजिक कार्यकर्त्या
१९९८: ताराचंद परमार — स्वातंत्र्यसैनिक
१९९१: जगन्नाथराव जोशी — गोवा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक
१९६७: बालगंधर्व — गायक व नट पद्म भूषण, संगीत नाटक अकादमी पुरस्कार
१९१९: एमिल फिशर — जर्मन रसायनशास्त्रज्ञ — नोबेल पुरस्कार
१५४२: लिसा डेल जिकॉन्डो — लिओनार्डो दा विंची यांच्या पेंटिंग मोनालिसा मधील महिला
१२९१: रुडॉल्फ (पहिला) — जर्मनीचा राजा (जन्म: १ मे १२१८ )





## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१५ जुलै**

## ट्विटरची सुरुवात : जागतिक संवादाचे व्यासपीठ



आज एक्स (पूर्वीचे ट्विटर) म्हणून ओळखले जाणारे सोशल मीडिया व्यासपीठ २००६ मध्ये सुरू झाले. ट्विटरची कल्पना जॅक डोर्सी यांनी मांडली. त्यांना मोबाईलद्वारे लहान संदेश पाठविण्याची सोपी आणि जलद सेवा तयार करायची होती. या कल्पनेला बिझ स्टोन, इव्हान विल्यम्स आणि नोआ ग्लास यांनी साथ दिली आणि त्यांनी मिळून ट्विटरची स्थापना केली.२१ मार्च २००६ रोजी जॅक डोर्सी यांनी पहिला ट्विट केला. त्यात त्यांनी "just setting up my twttr" असा संदेश लिहिला. सुरुवातीला कंपनीचे नाव "twttr" असे होते. त्यानंतर ते Twitter असे करण्यात आले. जुलै २००६ मध्ये ही सेवा सर्वसामान्यांसाठी खुली करण्यात आली.२००७ मध्ये अमेरिकेतील South by Southwest (SXSW) या तंत्रज्ञान परिषदेत ट्विटरला मोठी लोकप्रियता मिळाली. त्यानंतर जगभरातील राजकारणी, उद्योगपती, कलाकार, पत्रकार आणि सामान्य नागरिकांनी या माध्यमाचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला. १४० अक्षरांच्या मर्यादेमुळे (नंतर २८० अक्षरे) थोडक्यात आणि प्रभावी संवाद साधण्याची ट्विटरची शैली लोकप्रिय ठरली.ऑक्टोबर २०२२ मध्ये उद्योगपती इलॉन मस्क यांनी ट्विटर विकत घेतले. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये ट्विटरचे नाव बदलून 'एक्स (X)' करण्यात आले. आज एक्स हे केवळ सोशल मीडिया व्यासपीठ नसून, जगभरातील ताज्या घडामोडी, चर्चा आणि माहितीची देवाणघेवाण करणारे प्रभावी माध्यम म्हणून ओळखले जाते.

## मराठी रंगभूमीचा सुवर्णयुग घडविणारे 'बालगंधर्व'

**पुण्यतिथी विशेष**

मराठी संगीत नाटकांचा इतिहास लिहिताना नारायण श्रीपाद राजहंस अर्थात 'बालगंधर्व' यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले जाते. आपल्या मधुर, सुरेल आवाजाने, अप्रतिम अभिनयाने आणि स्त्रीभूमिकांतील सहजसुंदर सादरीकरणाने त्यांनी मराठी रंगभूमीला अभूतपूर्व वैभव प्राप्त करून दिले. त्यांच्यामुळे संगीत नाटकांची लोकप्रियता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचली आणि मराठी रंगभूमीला एक सुवर्णयुग लाभले.२६ जून १८८८ रोजी पुणे जिल्ह्यातील नागठाणे येथे त्यांचा जन्म झाला. लहानपणापासूनच त्यांना संगीताची आवड होती. १९०५ मध्ये लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या उपस्थितीत झालेल्या एका कार्यक्रमात



त्यांच्या गायनाने सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यांच्या सुरेल गायनाने प्रभावित होऊन टिळकांनी त्यांना 'बालगंधर्व' ही पदवी दिली. त्यानंतर हेच नाव त्यांच्या आयुष्याची ओळख बनले.त्या काळात रंगभूमीवर महिलांना काम करण्यास सामाजिक बंधने होती. त्यामुळे बालगंधर्व यांनी शकुंतला, सुभद्रा, रुक्मिणी, सिंधू, भामिनी, द्रौपदी अशा अनेक स्त्री भूमिका इतक्या प्रभावीपणे साकारल्या की प्रेक्षक अक्षरशः भारावून जात. त्यांचा देखणा वावर, भावपूर्ण अभिनय, उत्कृष्ट वेशभूषा आणि गोड, मधुर आवाज यामुळे प्रत्येक भूमिका जिवंत वाटत असे.बालगंधर्व हे किर्लोस्कर नाटक मंडळी आणि नंतर गंधर्व नाटक मंडळीचे प्रमुख कलाकार होते. 'संगीत मानापमान', 'सौभद्र', 'एकच प्याला', 'संशयकल्लोळ', 'स्वयंवर' यांसारख्या गाजलेल्या संगीत नाटकांमधील त्यांच्या भूमिका आजही रसिकांच्या स्मरणात आहेत. त्यांनी गायलेली अनेक नाट्यगीते आजही संगीतप्रेमी तितक्याच आवडीने ऐकतात.मराठी संगीत नाटकांच्या विकासात बालगंधर्व यांचे योगदान अतुलनीय मानले जाते. त्यांना १९६४ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठी संस्कृती, संगीत आणि रंगभूमीच्या सेवेसाठी त्यांनी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे.१५ जुलै १९६७ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतरही त्यांचा आवाज, अभिनय आणि नाट्यसंगीताचा वारसा आजही मराठी रसिकांच्या हृदयात जिवंत आहे. मराठी रंगभूमीचा इतिहास आणि संगीत नाटकांची परंपरा जिवंत असेपर्यंत 'बालगंधर्व' हे नाव अजरामर राहील.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



SALE 25 TO 50 % OFF
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था...
भंडारी
क्लॉथ सेंटर सिल्क ॲण्ड सारीज
मनासारखी खरेदी आणि भरपुर फायदा देणारा सेल
(संपूर्ण ए.सी. शोरुम)
मेनरोड कॉर्नर, बाजारपेठ, संगमनेर

# कोल्हार-घोटी राज्यमार्गाच्या निकृष्ट कामाविरोधात नागरिक आक्रमक !



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -अकोले तालुका व संगमनेर तालुका यांना जोडणारा कोल्हार घोटी राजमार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. सरकारच्या पैशाचा विनियोग या ठिकाणी झाला असून या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने करा व या निकृष्ट कामाची चौकशी करा या मागणीचे निवेदन सामाजिक कार्यकर्ते दत्ता कोकणे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले.

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दत्ता कोकणे, नवनाथ देशमाने ,सागर वाघचौरे बाळासाहेब कानवडे, जावेद तांबोळी, आशिष गोसावी, शुभम हासे यांच्यासह विविध कार्यकर्त्यांनी निवेदन दिले.

या निवेदनात म्हटले आहे की कोल्हार घोटी राज्यमार्गाचे काम हे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे. डांबरीकरणाचा वरचा थर हा अत्यंत पातळ असून यामुळे ठिकठिकाणी खड्डे पडले आहे याचबरोबर सातत्याने धूळ उडत आहे. या रस्त्यावरून प्रवास करणारे प्रवासी, वाहनचालक, विद्यार्थी, नागरिक महिला व युवक यांना या धुळीचा मोठा त्रास होत आहे. हे काम अत्यंत चुकीचे आणि निकृष्ट झाली असून तातडीने या कामाची दुरुस्ती व्हावी याचबरोबर या निकृष्ट कामाची शासकीय स्तरावरून तातडीने चौकशी व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

याचबरोबर संगमनेर तालुक्यामध्ये सध्या टक्केवारी जोरात वाढली असून यामुळे असे रस्ते खराब होत असल्याची टीका दत्ता कोकणे यांनी केली असून या कामाच्या निषेधार्थ उद्या मंगळवार दिनांक १४ जुलै २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता सातवा मैल या ठिकाणी परिसरातील नागरिकांसह भव्य रस्ता रोको करण्यात येणार असल्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

या कामाची तातडीने दुरुस्ती व चौकशी न झाल्यास या पुढील काळात मोठे आंदोलन उभारले जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे.

# संगमनेरात 'साहित्य जत्रा' उत्साहात

## नारायण सुर्वे यांचे साहित्य जगण्याची हिम्मत देणारे – उत्तम कांबळे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- आयुष्याच्या प्रवासाने माणसाला भाकरीची किंमत शिकवली. त्या भाकरीच्या भुकेतून निर्माण झालेल्या साहित्याने जगण्याच्या वेदना शब्दबद्ध केल्या. त्यामुळे कवी नारायण सुर्वे यांचे साहित्य माणसाला जगण्याची हिम्मत आणि शक्ती देते, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष तथा ज्येष्ठ संपादक उत्तम कांबळे यांनी केले. साहित्य कला व सांस्कृतिक संघ तसेच सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात वरिष्ठ महाविद्यालय, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'साहित्य जत्रा' कार्यक्रमात संमेलनाध्यक्ष म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते झाले. तर ग्रंथदिंडीचे उद्घाटन माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर सिनेगीतकार बाबासाहेब सौदागर, पद्मश्री रघुवीर खेडकर, नाट्यलेखक सोमनाथ मुटकुळे, हिरालाल पगडाल, पत्रकार संदीप वाकचौरे, संस्थेचे अध्यक्ष रमेश शिंदे, कार्याध्यक्ष डॉ. विवेक वाकचौरे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ, डॉ. अरुण गायकवाड, सुभाष सोनवणे, सुनील गोसावी, शशिकांत शिंदे, तुकाराम धांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

उत्तम कांबळे म्हणाले, यंदा कवी नारायण सुर्वे यांचे जन्मशताब्दी वर्ष असतानाही शासनाला त्याचा विसर पडल्याचे दिसते. कदाचित त्यांच्या विचारांची धार काहींना अस्वस्थ करत असेल. मात्र संगमनेरकरांनी त्यांची आठवण जपून हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांचे कौतुक करावे लागेल. बहुजन साहित्यिकांनी पारंपरिक साहित्याचे नियम मोडले. नारायण सुर्वे यांनी आयुष्यभर स्वतःची ओळख आणि आईचा शोध घेतला. ते जन्मतःच कवी होते आणि कविता हेच त्यांच्या जगण्याचे कारण होते. जगण्याशी आणि शब्दांशी बेईमानी करणाऱ्यांची कविता कधीच चांगली होत नाही. सुर्वे हे कोणत्याही चौकटीत न बसणारे कवी होते. समाज अधिक संवेदनशील आणि सुसंस्कृत



होण्यासाठी साहित्य आणि कलावंतांची गरज असते. जिथे धर्म आणि अध्यात्माचा विचार थांबतो, तिथे कवितेचा जन्म होतो. अशा साहित्य संमेलनांमधून सुर्वे यांच्या विचारांचा जागर होत असल्याने हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.

उद्घाटन भाषणात माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, नारायण सुर्वे यांनी श्रमिकांचे जीवन आणि त्यांच्या वेदना साहित्यात आणल्या. त्यामुळे श्रमिकांचा आवाज समाजाच्या व्यापक स्तरापर्यंत पोहोचला. जगभरातील अनेक सामाजिक चळवळींना साहित्याने ताकद दिली आहे. श्रमिक वर्ग लिहिता झाला आणि त्यांचे वास्तव साहित्यात प्रतिबिंबित झाले. राजकारण्यांनी साहित्यिकांना कायम जवळ केले असून त्यामुळे राजकारण अधिक सुसंस्कृत होण्यास मदत झाली आहे. सिनेगीतकार बाबासाहेब सौदागर म्हणाले, टाळ आणि चाळ हे महाराष्ट्राचे वैशिष्ट्य आहे. आज पुरस्कार देणारे कमी आणि तिरस्कार करणारे अधिक झाले आहेत. मात्र प्रहार सहन केले तरच हार गळ्यात पडतात.

पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी आपल्या साहित्यिक आणि कलात्मक जीवनप्रवासातील अनुभव उपस्थितांसमोर उलगडले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रमेश शिंदे यांनी केले, तर सूत्रसंचालन पत्रकार नेहा सराफ यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ भांडगे, नितीन कोळफकर, डॉ. निलीमा निघुते, वंदना बाचकर, प्रकाश पारखे, विजय पाटील, अशोक वरुडे, अनुराधा आहेर, आसावरी रत्नपारखी, दीपक टाक, अशोक शेटे, पुष्पाताई निऱ्हाळी, जयश्री शिंदे आदींनी परिश्रम घेतले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# विवाहितेची आत्महत्या, पतीसह तीघांवर गुन्हा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जांबुत बुद्रुक येथे चारित्र्याच्या संशयातून झालेल्या छळामुळे २८ वर्षीय विवाहितेने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलत आपली जीवन यात्राच संपवली. ही हृदयद्रावक घटना उघडकीस येताच संपूर्ण पठार भागात खळबळ उडाली आहे.



विठाबाई विकास घुले वय २८ असे मृत महिलेचे नाव असून, तिच्या मृत्यूनंतर माहेरच्यांनी गंभीर आरोप करत पतीसह सासरच्या तिघांविरुद्ध घारगाव पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे. विठाबाई या घरच्यांना शेतात जात असल्याचे सांगून घराबाहेर पडल्या, मात्र त्या परत न आल्याने कुटुंबीयांनी शोध सुरु केला. याबाबत घारगाव पोलिसांत हरवल्याची तक्रारही नोंदविण्यात आली होती. शोधमोहीम सुरु असताना टेकडवाडी परिसरातील मुळा नदीकाठी त्यांची चप्पल, कपडे व इतर साहित्य आढळून आले. त्यानंतर कवठे मळ्याजवळील विहिरीत पाण्यावर तरंगत असलेला त्यांचा मृतदेह आढळला. पोलिसांनी पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदनासाठी लोणी येथील प्रवरा वैद्यकीय रुग्णालयात पाठविला.

या घटनेनंतर माहेर आणि सासरच्या नातेवाईकांमध्ये तीव्र वाद निर्माण झाला. परिस्थिती तणावपूर्ण झाल्याने पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत महिलेचे वडील सीताराम साबळे (रा. चिंचाळे, ता. राहुरी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पती विकास पहिलवान घुले, नर्मदा पहिलवान घुले आणि हिरामण लक्ष्मण घुले (रा. जांबुत बुद्रुक, ता. संगमनेर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
अत्याधुनिक लॉमिनार ऑपरेशन थिएटर
शस्त्रक्रिया
• मेंदुविकार शस्त्रक्रिया • किडनी शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण • मुत्रविकार शस्त्रक्रिया
• गुडघा प्रत्यारोपण • दुर्बिणीद्वारे पोटाच्या व
• पोटाच्या शस्त्रक्रिया • आतड्याच्या शस्त्रक्रिया
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ मोबा. ७०३८२७०३८२




अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25